बीड । सोमवार
२४.०२.२०२५
वर्षे : ४ अंक : ३१७
किंमत : ३ रु. पाने : ४

दैनिक ● www.marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■

dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955





# मनोज जरांगे पाटील यांना डावलून मराठ्यांचा कोल्हापुरातून नवा एल्गार



**कोल्हापूर । प्रतिनिधी**

मराठा आरक्षणाच्या लढाईत आता मनोज जरांगे पाटील यांना एकटे पाडले जाणार आहे. राज्यभरातील जवळपास ४२ संघटनांनी आज कोल्हापुरात राज्यस्तरीय परिषद घेत एकत्रितरित्या ही लढाई पुढे घेऊन जाण्याचा निर्धार केलाय.

तर जरांगे यांच्या मराठवाड्यात दुसरी मोठी परिषद घेण्याची घोषणा आज करण्यात आली असून जरांगे पाटील यांना हा शह मनाला जात आहे.

मराठा समाजाच्या मागण्यांसाठी आता नव्याने ठिणगी पडली आहे. मनोज जरांगे पाटील यांनी मराठ्यांची ताकद एकवटली त्यातून सरकारवर दबावही निर्माण झाला. मात्र त्यांच्या बदलणाऱ्या भूमिकांमुळे नेमके हाती काय लागले? हा सवाल मराठ्यांना पडत आहे. त्यामुळे ज्या संघटनांनी एकत्र येत मराठा क्रांती मोर्चा सारखे आंदोलन उभे करून मराठी मनात हुंकार आणि स्फूर्ती भरली. कोल्हापुरात ४२ संघटनांची राज्यव्यापी बैठक. त्या संघटना आता पुन्हा एकवटल्या आहेत. शिवसंग्राम, अखिल भारतीय मराठा सेवा संघ, राष्ट्रीय मराठा महासंघ, मराठा आरक्षण समन्वय समिती, मराठा क्रांती ठोक मोर्चा अशा ४२ संघटनांनी आज कोल्हापुरात राज्यव्यापी बैठक घेऊन पुन्हा एल्गार पुकारला आहे. त्यानुसार १० मार्चपर्यंतचा अल्टिमेटम सरकारला दिला आहे.

### परभणीत मोठी महापरिषद घेण्यात येणार

आजच्या बैठकीत आरक्षण, सारथी, अण्णासाहेब पाटील महामंडळ यांच्यासह दहा प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत. त्यासाठी परभणीत मोठी महापरिषद घेण्यात येणार असून मुख्यमंत्र्यांनी तिथे येऊन मराठा समाजाला काय देणार याचे उत्तर देण्याची मागणी यावेळी करण्यात आली.

एकूणच पाहायला गेले तर जरांगे पाटील यांना बाजूला ठेऊन मराठा समाज आता आंदोलनात उतरताना दिसत आहे. त्यातून जरांगेंची समाजावरील पकड आता कमी होताना दिसत आहे. जरांगे यांना शह देण्यासाठी दुसरी परिषद परभणीमध्ये घेण्याचा निर्धार यात झाला आहे. त्यामुळे मराठा आंदोलनाचे पुढे काय होणार हे पाहणे महत्वाचे असणार आहे.

**मनोज जरांगे आणि आमच्या मागण्या वेगळ्या**

जरांगे पाटील यांना सोडून इतर संघटना एकवटल्याने मराठा समाजात फूट पडल्याची चर्चा आहे. मात्र जरांगे आणि आमच्या मागण्या वेगळ्या असून आम्ही त्या पूर्ण करण्यासाठी लढणार असल्याचे ज्योती मेटे यांनी स्पष्ट केलंय.

# हुश्श... जिंकलो !

## पाकिस्तान चॅम्पियन ट्रॉफीतून 'आऊट'; टीम इंडियाने पॉइंट टेबल मध्ये घेतली मोठी झेप

**वृत्तसंस्था**

भारतानं आपल्या पारंपरिक प्रतिस्पर्धी पाकिस्तानचा सात विकेट्सनी धुव्वा उडवून आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफीत सलग दुसरा विजय साजरा केला. या विजयासह भारतानं चॅम्पियन्स ट्रॉफीच्या उपांत्य फेरीचं तिकीट जवळजवळ निश्चित केलं आहे. न्यूझीलंडपाठोपाठ भारताकडूनही झालेल्या पराभवानं यजमान पाकिस्तानचं आव्हान

▶▶ उर्वरित पान २ वर



## घरकुलांना आता ५० हजार रुपयांचं अतिरीक्त अनुदान मिळणार, ग्राम विकास मंत्री जयकुमार गोरेंची माहिती

**मुंबई । प्रतिनिधी**

प्रधानमंत्री आवास योजनेतील घरकुलांना आता ग्रामीण भागात ५० हजारांचे अतिरिक्त अनुदान मिळणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबतचा निर्णय घेतला असून, बजेटमध्येही त्याबाबत तरतूद केल्याची माहिती ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी दिली आहे. ग्रामीण भागात घरकुलासाठी २ लाख १० हजार रुपयापर्यंत निधी मिळणार आहे. अतिरिक्त अनुदानाचा खर्च राज्य सरकार उचलणार असल्याचे गोरे म्हणाले. वर्षभरात २० लाख घरकुलांचे काम पूर्ण करण्याचा सरकारचा संकल्प असल्याची माहिती ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी दिली. प्रत्येकाच्या स्वप्नातलं छान घर उभा राहणार असल्याचेही गोरे म्हणाले. धाराशिव येथील कार्यक्रमात जयकुमार गोरे बोलत होते.



▶▶ उर्वरित पान २ वर

## अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाच्या जिल्हाध्यक्ष पदी अशोक होळकर व मराठवाडा उपाध्यक्षपदी अनिल कुलकर्णी

**बीड । प्रतिनिधी**

अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाच्या मराठवाडा प्रदेश उपाध्यक्षपदी अनिल देवा कुलकर्णी तर जिल्हाध्यक्ष म्हणून अशोक होळकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाचे कार्य संपूर्ण राज्यभरात असून ग्रामीण भागातील पत्रकारांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी संघ काम करीत आहे. केंद्रीय अध्यक्ष मनोहर सुने, प्रदेशाध्यक्ष कैलास देशमुख, मराठवाडा प्रदेश अध्यक्ष जगदीश बुलबुले यांच्या सुचनेवरून ही निवड करण्यात आली आहे. संघाच्या ध्येय धोरणानुसार काम करून संघटना वाढीसाठी आणि पत्रकारांच्या हितासाठी काम करण्याच्या सूचना या पत्रामध्ये देण्यात आल्या आहेत. या निवडीचे सर्वस्तरातून अभिनंदन होत आहे. तर निवडीनंतर अनिलदेवा कुलकर्णी आणि अशोक होळकर यांनी ग्रामीण पत्रकार संघाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील पत्रकारांचे प्रश्न शासन दरबारी मांडून ते सोडविण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगीतले.



## सोमवारी खात्यात जमा होणार २००० रुपये



**मुंबई । प्रतिनिधी**

देशातील शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्वाची बातमी समोर आली आहे. पंतप्रधान किसान सन्मान निधी योजनेचा १९ वा हप्ता (२४ फेब्रुवारी) शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होणार आहे. केंद्र सरकार देशातील शेतकऱ्यांना उद्या २२ हजार कोटी रुपयांचा निधी वितरीत करणार आहे. किसान सन्मान निधीची रक्कम थेट शेतकऱ्यांच्या खात्यावर पाठवली जाणार आहे. पण हा निधी तुमच्या खात्यात जमा झाला की नाही? हे तुम्हा कसे तपासू शकता? जाणून घेऊयात याबाबतची

▶▶ उर्वरित पान २ वर

## बाजार समित्यांची राज्यस्तरीय परिषद पुण्यात, राज्यभरातून पदाधिकारी सहभागी होणार

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील बाजार समित्यांच्या विविध विषयांसंदर्भात संवाद साधण्यासाठी सोमवार, २४ फेब्रुवारी रोजी पुणे येथे बाजार समित्यांच्या राज्यस्तरीय परिषदेचे आयोजन करण्यात आल्याची माहिती पणन मंत्री तथा महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे अध्यक्ष जयकुमार रावल यांनी दिली. या परिषदेत



▶▶ उर्वरित पान २ वर

## मनोज जरांगे यांना मराठा संघटनांकडून एकटे पाडण्याचा प्रयत्न, सुरेश धस पाटलांच्या मदतीला धावले

**धाराशिव । प्रतिनिधी**

मराठा आरक्षणाच्या लढाईत मनोज जरांगे पाटील एकटे पडणार की काय अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. कारण आज ४२ मराठा संघटनांनी कोल्हपुरात एकत्र येऊन परिषद घेत आमच्या मागण्या जरांगे पाटील यांच्यापेक्षा वेगळ्या असल्याचे सांगितले.

मराठा संघटनांच्या या पवित्र्यामुळेच जरांगे पाटील यांना ठरवून एकटे पाडले जात असल्याचे बोलले जाते. कोल्हापुरात राज्यस्तरीय परिषद घेत एकत्रितरित्या मराठा आरक्षणाची लढाई पुढे घेऊन जाण्याचा विविध संघटनांनी केलाय. दुसरीकडे जरांगे पाटील यांच्या मराठवाड्यात दुसरी मोठी परिषद घेण्याची घोषणा करण्यात आली असून जरांगे पाटील यांना हा शह मनाला जात आहे. .....तर गैरअर्थ काढू नका, सुरेश धस जरांगे पाटलांच्या मदतीला धावले



जरांगे पाटील यांची कोंडी होत असताना त्यांच्या मदतीला भाजप आमदार सुरेश धस धावले आहेत. एखाद्या जिल्ह्यात कार्यक्रम झाला आणि त्या कार्यक्रमाला जरांगे पाटलांना बोलवलं नाही तर त्याचा गैरअर्थ काढणे चुकीचे आहे, असे सुरेश धस म्हणाले. कोल्हापूरमध्ये मनोज जरांगे यांना वगळून मराठा समाजाच्या इतर संघटनांनी अधिवेशन बोलावलं होतं. ते अधिवेशन

▶▶ उर्वरित पान २ वर

# प्रेम, संवाद, सहवास, सहनशीलतेमुळे मराठीचा अमराठीशी सुखाने संसार !

### साहित्य संमेलनातील परिसंवादाचा सूर

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

प्रेम, संवाद, सहवास आणि सहनशीलतेमुळे संसार सुरळीत होतोय असा सूर अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनातत आयोजित 'मनमोकळा संवाद - मराठीचा अमराठी संसार' या परिसंवादातून निघाला.

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या दुसऱ्या दिवशी मनमोकळा संवाद - मराठीचा अमराठी संसार या विषयावरील परिसंवादात माजी सनदी अधिकारी डॉ. ज्ञानेश्वर मुळे आणि डॉ. साधना शंकर, रेखा रायकर आणि मनोज कुमार , ज्येष्ठ पत्रकार राजदीप सरदेसाई आणि सागरिका घोष, गायिका उद्योजक डॉ. मंजिरी वैद्य आणि प्रसन्न अय्यर या मान्यवरांनी सहभाग घेतला. विशेष पाहुणे म्हणून भारती विद्यापीठाचे कार्यवाह आमदार डॉ. विश्वजीत कदम उपस्थित होते. या परिसंवादाचे संयोजन अस्मिता पांडे आणि बाळ कुलकर्णी यांनी केले होते.



परिसंवादादरम्यान मराठी-अमराठी संसारातील संवाद, संस्कृतीतील भिन्नता, कौटुंबिक नातेसंबंधांवरील परिणाम आणि मुलांच्या भाषिक जडणघडणीसंदर्भातील मुद्द्यांवर चर्चा झाली. भाषेमुळे एकमेकांशी संवाद होत असतो त्यामुळे अधिक व्याकरणात न पडता अधिकाधिक लोकांनी संवाद आपल्या आपल्या मातृभाषेत साधला पाहिजे असे एक मत या परिसंवादात व्यक्त झाले. परिसंवादात सहभागी झालेल्या सर्वच मान्यवरांनी वैवाहिक जीवनातील भाषिक गमतीजमती उलगडल्या, तर डॉ. ज्ञानेश्वर मुळे यांनी विविध भाषांमधील संवादाने समजुतीला कसा हातभार लावला याची माहिती दिली. मनोज कुमार यांनी आपणास मराठी पूर्णपणे समजत असून मराठी सिनेमा आणि नाटकाचे चाहते असल्याचे त्यांनी

▶▶ उर्वरित पान २ वर

## उपराष्ट्रपती धनखड यांचे घृष्णेश्वराचे सपत्निक दर्शन; कैलास लेणीचीही केली पाहणी





**छ.संभाजीनगर । प्रतिनिधी**

भारताचे उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी आज वेरूळ येथील घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग मंदिरात दर्शन घेऊन विधिवत पूजा केली. त्यांच्या समवेत उपराष्ट्रपतींच्या सुविद्य पत्नी डॉ. श्रीमती सुदेश धनखड, राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, खासदार डॉ. भागवत कराड होते. या वेळी मंदिर प्रशासनाने त्यांचे स्वागत केले.

त्यानंतर उपराष्ट्रपती धनखड यांनी विश्ववारसा स्थळ असलेल्या वेरुळ येथील लेणी क्र. १६ कैलास लेणेची पाहणी केली. त्यांनी येथील वारसास्थळ आणि लेणींविषयी माहिती जाणून घेतली. या परिसरातील कलाकृती ह्या अदभूत असल्याचे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले.



# उत्सुकतेने सगळेच झोपले...

## मराठी 'साहित्याच्या भूमी'तून 1980च्या दशकानंतर वाचनकक्षेच्या वयात आलेल्या तीन पिढ्या परागंदा होत गेल्या याची कारणे अनेक...

सांप्रतकाळात अभिजात वगैरे दर्जाचा दुरभिमान पोसणाऱ्या मराठी 'साहित्याची भूमी' कोणत्या स्थितीत, याचे उत्तर तीन पिढ्यांच्या वाचन- संसारातल्या किंवा वाचन- काडीमोडानंतरच्या व्यवहारांवरून शोधावे लागेल. १९८१ ते ९६ पर्यंत वाचनकक्षेच्या साधारण वयात आलेली 'मिलेनियल' पिढी, १९९७ ते २०१२ पर्यंत जन्मलेली 'जेन झी' पिढी आणि २०१० ते २०२४ या काळात भूतळावर कोसळलेली 'अल्फा' पिढी. त्या आधीच्या 'जेन एक्स' अथवा साठोत्तरीत बंडखोरीचे झेंडे फडकावणारी 'बूमर्स' या पिढीतील तथाकथित मुरब्बी उरलेत फक्त पुरस्कार घेऊन क्षीण नाचण्यासाठी आणि क्षणसाजऱ्या कौतुकासाठी. तर याआधीच्या दोन पिढ्यांना व्यवधाने नव्हती; त्याच्या शतपटींत नंतर वाढली. पुढल्या पिढ्यांना उपग्रह वाहिन्या आल्यानंतरच्या द्रुतगतीने धावणाऱ्या क्रांत्यांमध्ये जगाशी अद्यायावत राहत संगणकाच्या सतत विकसित होत राहणाऱ्या आवृत्त्यांशी एकरूप होताना, माहितीच्या स्फोटांमध्ये मेंदूत आधी असलेल्या तपशिलांना राखत बुद्धीशकले होण्यापासून स्वत:ला सावरताना आणि समाज माध्यमांची व्यसननशा अंगभर भिनूनदेखील सुखात जगताना किती तारेवरची कसरत करावी लागली याची जाणीवदेखील 'जेन एक्स' किंवा 'बूमर्स'ना असू शकत नाही. तर या अजस्त्र पसाऱ्यात त्यांच्याकडून ग्रंथोत्तेजनाची अपेक्षा करणे किती अवघड गोष्ट, हेदेखील उमजू शकत नाही. या पिढ्या ई-मेल्स, इन्स्टापोस्ट, व्हॉट्सअॅप पिंग्ज आणि या विद्यापीठात फॉरवर्डींनी पसरविलेले उपयोजित प्रबंध डोळे दुखेस्तोवर वाचतात. रील्स-व्हिडीओ न्याहाळत त्यांचे तासचे तास निष्प्रभ होतात. 'ट्रेण्ड'च्या नावाखाली महापुरुषाची जयंती आपापल्या वाहनाला झेंडा लावून साजरी करण्यात त्यांना धन्यता वाटते. शुक्रवारी थिएटरमध्ये रक्त खवळून काढणारा वगैरे सिनेमा पाहून झाल्यावर 'छावा' कादंबरीच्या तीन-चारशे प्रती त्यांच्याकडून खरेदी केल्या जाऊ शकतात. 'साहित्याच्या भूमी'तल्या नापिकीचीच ही वेळ कधीपासून आली?

साहित्याच्या सकस भूमीचा ऱ्हास होण्याचा प्रकार 'मिलेनियल' पिढी रांगण्यास आरंभ करीत होती तेव्हापासूनच सुरू झाला, असे म्हणावे लागेल. श्री.पु. भागवतांनी ऑगस्ट १९८२ मध्ये 'सत्यकथा' मासिकाच्या शेवटच्या अंकात दिलेल्या निवेदनात म्हटले की 'आज घटकेला सत्यकथेच्या दरमहा १,८७५ प्रती काढण्यात येतात. त्यांपैकी १,२६८ वर्गणीदार, ३४५-५० विक्रेत्यांकडे किरकोळ खपणाऱ्या व २२० भेटीदाखल जाणाऱ्या असतात. दिवाळी अंकांची संख्या ४,२५० असते. या सर्व प्रतींचा एकूण मुद्रणखर्च, संपादकीय व व्यवस्थापकीय सहकाऱ्यांचे पगार, कार्यालयीन इतर खर्च, लेखक-कलावंतांचे मानधन, टपालहशील व तत्सम खर्च मिळून वर्षाला एकूण खर्च प्रत्यक्षाप्रत्यक्ष ९९,४७५ रुपये इतका होतो. वर्गणी, किरकोळ विक्री व जाहिराती मिळून एकूण उत्पन्न ५३,८५० रुपये इतका होतो. या वर्षी सत्यकथेचा निव्वळ तोटा ४५ हजार ६२५ इतका आहे. याचा अर्थ असा की, सत्यकथेचा प्रत्येक महिन्याचा अंक सुमारे पावणेचार हजार रुपये नुकसान सोसून काढला जातो'!

हे मासिक मराठी भाषेच्या समृद्धीसाठी, लोकांत साहित्याभिरुचीची जडण-घडण व्हावी यासाठी तोटा सोसून कित्येक दशके निघत होते. या परमोच्च स्थानी मानल्या जाणाऱ्या मासिकाची ही दु:स्थिती, तर पुढल्या क्रांत्यांत ढेपाळत गेलेल्या मासिक-साप्ताहिकांची काय परिस्थिती असणार? आज भाषेला अभिजात दर्जा आहे; पण अस्तित्वासाठी झगडणाऱ्या पण हाताच्या बोटांवर मोजता येणाऱ्या मासिकांना तगण्याइतपत 'प्राणवायू' लाभेल काय, हा प्रश्न अधिक महत्त्वाचा आहे. कारण अभिजात दर्जा मिळविणाऱ्या मल्याळममध्ये वर्गणीदारांनी जपलेली २३ च्या वर बालमासिके आहेत. तिसाहून अधिक साहित्यिक नियतकालिके आहेत. तमीळमध्ये दीड डझन साहित्यिक नियतकालिके, तर डझनभर बालमासिके आहेत. तेलुगूमध्ये देखील हीच परिस्थिती आहे. या भाषांची मुद्रित साहित्य वाचनाची भूक अधिक त्यांच्याच चित्रपटगोष्टी सध्या संपूर्ण भारतात तिकीटबारीवर गल्लाभरू ठरत आहेत, हादेखील योगायोग म्हणावा काय? या पार्श्वभूमीवर आपण कुठे आहोत, याची सांख्यिक गरिबी खिन्न करणारी नाही काय?

आदल्या पिढ्यांना- 'जेन एक्स' किंवा 'बूमर्स'ना- आपले बुद्धिचातुर्य अथवा ज्ञानपारंगतता चमकवण्यासाठी नियतकालिकांचाच आधार होता. नव्वदीनंतर अनेक आकर्षण केंद्रांनी हे पारंपरिक सहजम ार्ग जेव्हा बंद होण्यास सुरुवात झाली, तेव्हा मराठीत वाचक नावाचा नवा वर्ग घडण्याचे इतर मार्गही आपसूक खुंटत होते. नव्वदीच्या आरंभी मध्यमवर्गातील 'मिलेनियल' मुले इंग्रजी माध्यमांच्या शाळेत जाऊ लागली. दोन हजारानंतर निमशहरी भागातील निम्नम ध्यमवर्गातील पालकांनीही खिशाला भार सोसून इंग्रजी शाळांचा आग्रह आपल्या मुलांसाठी धरला. ती आज घराघरांतील कर्ती-धर्ती झालेली 'मिलेनियल' आणि 'जेन एक्स' मराठी भाषेपासून, साहित्यापासून दूर गेली यात नवल नाही. नवल हे आहे या काळात नाइलाज म्हणून मराठीतून शिक्षण घेणाऱ्या तुरळक तरीही संभाव्य वाचक घडू शकणाऱ्या वर्गापुढे तरी काय आणि किती चांगल्या दर्जाचे साहित्यिक वातावरण तयार केले गेले? नव्या लिहिणाऱ्यांचे आणि समकालातील प्रश्नांशी भिडणाऱ्यांचे किती साहित्य पुढे केले गेले? जुनेच आणि जुन्यांचेच, किंवा जुनाटच लिखाण नव्या वाचकांपुढे ठेवण्याचे उद्योग कशासाठी- कोणासाठी चालवले गेले?

शालेय पातळीवर भूषणावह स्थिती नसताना महाविद्यालयीन पातळीवर प्राध्यापकी साहित्यिकांचा नवा गोतावळा तयार होतो आहे. ज्यांचा मुख्य हेतू शिकविण्यापेक्षा पाठ्यक्रमांत असलेल्या पूर्वसुरी साहित्यिकांपेक्षा वरताण निर्मिती करणे हाच अधिक. गावातल्या गल्लीतील प्रकाशनगृहांमधून कवितांची-संपादनांची आणि ललितबंध अथवा कादंबऱ्यांची माळ लावण्यात हे पटाईत. तालुका-जिल्हा वृत्तपत्रांवर त्यांची पानभर परीक्षणे घडवून त्यांना 'स्व. अमुक-तमुक' नावांचे पुरस्कार लाभण्याचे पुण्यदेखील त्यांच्याकडून सराईतरीत्या घडते. मग झकर-'बुद्रुक' बनलेल्या 'फेसबुक' या माध्यमात समोरच्याला वात आणण्याइतपत या पुस्तकांचे प्रसिद्धीचाळे सध्या मोठ्या प्रमाणावर गाजताहेत आणि तोदेखील साहित्याचा एक नवा प्रवाह बनत चालला आहे. आत्मउन्नतीचे हे महामार्ग एकीकडे वाढत असताना 'साहित्येच्छुक' वर्गाची पुस्तके छापण्याच्या म हत्कार्यासाठी बड्या-बड्या प्रकाशनसंस्थाही सरसावल्या आहेत. केवळ पैसा आहे म्हणून आपल्या आयुष्याची नसलेली 'चित्तरकथा' हवी तशी बनवून सांगण्यासाठी शब्दांकनकारांची फौजसुद्धा तयार झाली आहेच. त्यामुळे खरोखरीच बरे लिहिणाऱ्याला आवृत्ती संपल्यानंतर पुस्तकाचे जेमतेम दहा टक्के मिळणारे मानधनदेखील आगामी काळात 'परागंदा' होते की काय अशी परिस्थिती आहे.

अशा भयकारी वातावरणामध्ये मराठी भाषक म्हणून केवळ सांगायला उरलेल्या 'मिलेनियल', 'जेन झी' आणि 'अल्फा' या वाचनक्षम पिढ्यांसमोर आपण साहित्यिक आदर्श कुठल्या मार्गाने ठेवू शकतो, याचा विचार सध्या कुठल्याही पातळीवर गांभीर्याने केला जात आहे काय? तसा तो केला गेला नाही, तर अभिजात अट्टहासानंतरच्या काळात उपनगरांत किंवा निमशहरांत रिकामी 'ग्रंथप्रदर्शने', कर्ण्यांवरची दुरभिमानी गीते यांची राज्यभर सारखीच स्थिती पाहायला मिळेल, हे भाकीत चुकणार नाही.

तूर्त 'अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन' नामक साहित्याचा पारंपरिक उत्सव दूरवरच्या भूमीत जोमात सुरू झालाय. अलीकडे वाचनाशी, साहित्याशी आणि एकुणातच भाषिक समृद्धीशी फारकत घेणाऱ्या या वार्षिक कार्यक्रमात यंदा प्रमादांचे इतके विक्रम घडलेत की, त्याकडे पाहत साहित्याची खरीच आस्था असलेले सर्व जण श्याम मनोहरांच्या साहित्य- अकादमी पुरस्कारप्राप्त कादंबरीचे शीर्षक आठवून, त्याबरहुकूम सुखनिद्रा घेत असल्यास नवल नाही.

पान 1 वरून पुढे...

### हुश्श... जिंकलो....

साखळीतच संपुष्टात आलं आहे. या सामन्यात भारतीय गोलंदाजांनी पाकिस्तानचा डाव २४१ धावांत गुंडाळून निम्मी लढाई जिंकली होती. मग विराट कोहलीनं वन डे कारकीर्दीतली आणखी एक सर्वोत्तम खेळी उभारून भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब केलं. त्याने चेंडूंत चौकारांसह धावांची खेळी उभारली. विराटनं श्रेयस अय्यरच्या साथीनं तिसऱ्या विकेटसाठी धावांची अभेद्य भागीदारी रचली. त्याआधी त्यानं शुभमन गिलच्या साथीनं दुसऱ्या विकेटसाठी ६९ धावांची भागीदारी रचली. श्रेयस अय्यरनं आणि शुभमन गिलनं धावांची खेळी केली. तत्पूर्वी, प्रथम फलंदाजी करताना बाबर आझम आणि इमाम उल हक यांनी पाकिस्तानला चांगली सुरुवात करून दिली. त्यांनी पहिल्या विकेटसाठी ४१ धावांची भागीदारी केली. ही भागीदारी हार्दिक पांड्याने मोडली. त्याने बाबरला तंबुत पाठवले. त्याला २६ चेंडूत पाच चौकारांसह फक्त २३ धावा करता आल्या. पुढच्याच षटकात इमाम उल हकही धावबाद झाला. त्याला २६ चेंडूत फक्त १० धावा करता आल्या. ४७ धावांत दोन विकेट गमावल्यानंतर सौद शकील आणि कर्णधार मोहम्मद रिझवान यांनी पाकिस्तान डावाची धुरा सांभाळली. दोघांनी तिसऱ्या विकेटसाठी १०४ धावांची भागीदारी केली. दरम्यान, शकीलने त्याच्या एकदिवसीय कारकिर्दीतील चौथे अर्धशतक झळकावले. ही भागीदारी अक्षर पटेलने मोडली. त्याने रिझवानला क्लीन बोल्ड केले. ७७ चेंडूत तीन चौकारांसह ४६ धावा काढल्यानंतर तो बाद झाला. रिझवान आऊट होताच पुन्हा एकदा विकेटची झुंबड उडाली. ७६ चेंडूत ५ चौकारांसह ६२ धावा काढल्यानंतर शकीलही हार्दिक पांड्याचा बळी ठरला. तैय्यब ताहिर चार धावा काढून बाद झाला आणि सलमान अली आगा १९ धावा काढून बाद झाला. सलमानला कुलदीपने आणि तैय्यबाला जडेजाने पॅव्हेलियनमध्ये पाठवले. शाहीन आफ्रिदीला खातेही उघडता आले नाही. नसीम शाह १४ धावा काढून बाद झाला आणि हरिस रौफ आठ धावा काढून बाद झाला. कुलदीप आणि हार्दिक व्यतिरिक्त हर्षित राणा, अक्षर आणि जडेजा यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली.

### घरकुलांना आता...

पहिल्या टप्प्यातील १० लाख घरकुलांचा पहिला हप्ता अमित शाहा यांच्या उपस्थितीत कालच वितरित झाल्याचे गोरे म्हणाले.

महाराष्ट्र राज्याला देशातील सर्वात मोठं घरकुलांचं उद्दीष्ट मिळालं आहे. २० लाख घरांचे उद्दीष्ट राज्याला मिळालं आहे. देवेंद्र फडणवीस साहेबांनी केंद्र सरकारकडे याबाबत पाठपुरावा केला होता असे जयकुमार गोरे म्हणाले. १०० दिवसांचा जो कार्यक्रम दिला होता, त्यामध्ये पहिल्या ४५ दिवसात आम्ही १०० टक्के घरांना मान्यता दिली आहे. यामध्ये आम्ही १० लाख ३४ हजार घरांना पहिला हप्ता देखील आपण वितरीत केला असल्याचे जयकुमार गोरे म्हणाले. येणाऱ्या १५ दिवसात राहिलेल्या १० लाख घरांना आम्ही हप्ता देऊन काम सुरु करणार असल्याचे गोरे म्हणाले. वर्षभरात आम्ही २० लाख घरकुले बांधणार असल्याचे जयकुमार गोरे म्हणाले. १०० टक्के रिझल्ट यावा असे काम सुरु केले आहे. सगळ्यांना याबाबतच्या सूचना दिल्या असल्याचे गोरे म्हणाले. घरांच्या किंमतीमध्ये ग्रामीण भागात वाढ करण्यात आऐली आहे. आम्ही जे आश्वासन दिले होते, ते पूर्ण करण्याच्या दिशेने वाटचाल सुरु असल्याची माहिती मंत्री जयकुमार गोरे यांनी दिली आहे. प्रधान मंत्री आवास योजना सरकारच्या सर्वांसाठी घरे या मिशन अंतर्गत शहरी आणि ग्रामीण भागांवर लक्ष केंद्रित करून भारतातील घरांची कमतरता दूर करण्याचे लक्ष्य ठेवते. पीएमएवाय कार्यक्रम मागणी-आधारित दृष्टिकोनाचा अवलंब करतो ज्या अंतर्गत राज्ये, केंद्रशासित प्रदेशांना विशिष्ट निकषांवर आधारित मागणी सर्वे क्षणाद्वारे ओळखल्या गेलेल्या सर्व पात्र लाभार्थ्यांसाठी प्रकल्प मंजूर करण्याचा अधिकार दिला जातो.

### सोमवारी खात्यात...

सविस्तर माहिती. पंतप्रधान किसान सन्मान निधी योजनेचा १८ वा हप्ता ऑक्टोबर २०२४ मध्ये शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झाला होता. आता या योजनेचा १९ वा हप्ता २४ फेब्रुवारी रोजी जारी केला जाणार आहे. पीएम किसान योजनेंतर्गत, शेतकऱ्यांना वार्षिक ६,००० रुपये दिले

पान १ वरून पुढे...

जातात, जे प्रत्येकी २,००० रुपयांच्या हप्त्यांमध्ये थेट शेतकऱ्यांच्या खात्यात हस्तांतरित केले जातात. ही योजना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारने २०१९ मध्ये सुरू केली होती. तेव्हापासून पात्र शेतकऱ्यांना योजनेचा लाभ मिळत आहे. दरम्यान, पंतप्रधान किसान सन्मान निधी योजनेचा १९ वा हप्ता हा उद्या शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होणार आहे. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी भागलपूर, बिहार येथून पीएम किसानचा १९ वा हप्ता जारी करणार आहेत. केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी शुक्रवारी ही घोषणा केली. पंतप्रधान २४ फेब्रुवारीला भागलपूर, बिहारम ध्ये पीएम-किसानचा १९ वा हप्ता जारी करतील. एकूण २२,००० कोटी रुपये थेट ९.८ कोटी पात्र शेतकऱ्यांच्या बँक खात्यात पाठवले जातील. पंतप्रधान किसान सन्मान निधी योजना केंद्र सरकारच्या कृषी आणि ग्रामीण विकास मंत्रालयाकडून चालवली जाते.

### बाजार समित्यांची....

राज्यातील सर्व बाजार समित्यांचे सभापती, उपसभापती, संचालक व सचिव सहभागी होणार आहेत. महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, पुणे मार्फत आयोजित ही परिषद पुण्याच्या बाणेरमधील बंटारा भवन येथे होणार असून उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याहस्ते या परिषदेचे उद्घाटन होईल. तर पणन व राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांच्यासह कृषी मंत्री माणिकराव कोकाटे, सहकार व पणन विभागाचे प्रधान सचिव प्रविण दराडे आदी या परिषदेस उपस्थित राहणार असल्याची माहिती मंत्री रावल यांनी दिली. राज्यातील ३०५ बाजार समित्या व त्यांचे ६२३ उप बाजारांच्या माध्यमातून राज्यात उत्पादित शेतमालाची सुरळीत विक्री व्यवस्था विकसित करण्याचे कामकाज गेल्या ४० वर्षापासून सुरू आहे. राज्यातील बाजार समित्यांच्या कामकाजात कालानुरूप बदल घडविणे, शेतमालाच्या विपणनामध्ये आधुनिक बाबींचा अंगीकार करणे, शेतकरी व इतर सर्व बाजार घटकांना द्यावयाच्या सोई-सुविधा, त्यात येणाऱ्या अडचणी व त्यावर करावयाच्या उपाय योजना आदी विषयांसंदर्भात या परिषदेमध्ये चर्चा केली जाणार आहे. राज्यात कृषी पणन व्यवस्थेत अद्ययावतपणाबरोबरच सुसूत्रता आणि समन्वयता आणण्याच्या दृष्टीने राज्यस्तरीय नियोजनाचे कामकाजही करण्यात येत आहे.

### मनोज जरांगे यांना...

जिल्ह्यापुरते असून त्याला जिल्ह्यापुरतेच महत्त्व आहे. म्हणून जरांगेंना बोलावलं नाही म्हणून गैरअर्थ काढू नका, असे सुरेश धस म्हणाले. मराठा समाजाच्या मागण्यांसाठी आता नव्याने ठिणगी पडली – मराठा समाजाच्या मागण्यांसाठी आता नव्याने ठिणगी पडली आहे. मनोज जरांगे पाटील यांनी मराठ्यांची ताकद एकवटली त्यातून सरकारवर दबावही निर्माण झाला. मात्र त्यांच्या बदलणाऱ्या भूमिकांमुळे नेमके हाती काय लागले? हा सवाल मराठ्यांना पडत आहे. त्यामुळे ज्या संघटनांनी एकत्र येत मराठा क्रांती मोर्चा सारखे आंदोलन उभे करून मराठी मनात हुंकार आणि स्फूर्ती भरली. त्या संघटना आता पुन्हा एकवटल्या आहेत. शिवसंग्राम, अखिल भारतीय मराठा सेवा संघ, राष्ट्रीय मराठा महासंघ, मराठा आरक्षण समन्वय समिती, मराठा क्रांती ठोक मोर्चा अशा ४२ संघटनांनी आज कोल्हापुरात राज्यव्यापी बैठक घेऊन पुन्हा एल्गार पुकारला आहे. त्यानुसार १० म ार्चपर्यंतचा अल्टिमेटम सरकारला दिला आहे.

### प्रेम, संवाद, ...

सांगितले. सागरिका घोष मराठीतले काही शब्द हिंदीत वेगळा अर्थ निघतो मूळ अर्थ कळल्यावर आलेले हसू रोखता आले नाही असा अनुभव सांगितला. डॉ. साधना शंकर सासुबाईंसोबत भाषेतून आणि भावनेतून झालेला संवाद एकमेकांसाठी पुरेसा होता. मराठी येत नसल्यामुळे सासुबाई मनसोक्त व्यक्त व्हायच्या, ही आठवण त्यांनी ताजी केली. डॉ. मंजिरी वैद्य तमिळ कुटुंबात गेल्यावर पाल या शब्दाला दूध असे म्हटल्याने निर्माण झालेल्या गमतीचा अनुभव त्यांनी सर्वांसमोर मांडला. सासरचे कुटुंब मोठे सर्वांनी सांभाळून घेतल्याचे रेखा रायकर यांनी सांगितले. परिसंवादाच्या शेवटी भाषिक विविधता हा अडथळा न ठरता समृद्धीचे साधन ठरू शकतो, असा सकारात्मक सूर उमटला.

## तेलंगणा बोगदा दुर्घटना

### ८ मजुरांसाठी बचाव कार्य सुरु सुरुच; हाक दिली, पण प्रतिसाद नाही, पाणी चिखल काढण्यासाठी हेव्ही पंप मागवला

तेलंगणातील नगरकुर्नूल जिल्ह्यातील श्रीशैलम लेफ्ट बँक कॅनॉल बोगद्याचा एक भाग २२ फ ेब्रुवारी रोजी कोसळला. यावेळी ८ कामगार अडकले असून एनडीआरडी-एसडीआरएफ बचावकार्य करत आहे. एसडीआरएफ अधिकाऱ्याच्या म्हणण्यानुसार, बोगद्याच्या आत जाण्यासाठी कोणताही मार्ग नाही. गुडघ्यापर्यंत चिखल आहे. बोगद्याच्या आत ऑक्सिजन पाठवला जात आहे. पाणी काढण्यासाठी १०० अश्वशक्तीचा पंप लावण्याचे आदेश दिले आहेत. १४५ छऊठऋ आणि १२० डऊठऋ जवान बचावकार्यासाठी तैनात आहेत. सिकंदराबादम धील इन्फंट्री डिव्हिजनचा भाग असलेल्या लष्कराच्या इंजिनीअर रेजिमेंटलाही सज्ज ठेवण्यात आले आहे. प्रवेश बिंदूपासून १४ किमी अंतरावर सुमारे ३ मीटर बोगद्याचा छत कोसळला



२२ फेब्रुवारी रोजी सकाळी साडेआठ वाजण्याच्या सुमारास हा अपघात झाला. बोगद्याच्या प्रवेश बिंदूपासून १४ किमी अंतरावर सुमारे ३ मीटर बोगद्याचा छत कोसळला आहे. यावेळी सुमारे ६० लोक बोगद्यात काम करत होते. ५२ लोक कसेबसे जीव मुठीत घेऊन बचावले, पण टनेल बोरिंग मशीन (ढइच्) चालवणारे ८ लोक अडकले. यामध्ये २ अभियंते, २ मशीन ऑपरेटर आणि चार मजुरांचा समावेश आहे. बचाव कार्य केले जात आहे.

श्री निवास उत्तर प्रदेशातील चंदौली येथील तेलंगणा बोगद्यात अडकलेला श्री निवास (४८) चांदौली जिल्ह्यातील सदर कोतवाली भागातील माटीगाव येथील रहिवासी आहे. श्री निवास हे २००८ पासून हैदराबाद येथील जेपी कंपनीत कनिष्ठ अभियंता (गए) म्हणून कार्यरत आहेत. याशिवाय उन्नाव येथे राहणारे म नोज कुमार हे देखील याच कंपनीत अभियंता म्हणून कार्यरत आहेत. बेहता पोलीस ठाण्याच्या मटकुरी गावातील रहिवासी अर्जुन प्रसाद यांचा तो मुलगा आहे.

**पंजाबमधील गुरप्रीत २० दिवसांपूर्वी कामावर परतला**

पंजाबमधील तरनतारन येथे राहणारा गुरप्रीत सिंग हा देखील बोगद्यात अडकला आहे. त्यांच्या घरी आई, पत्नी आणि २ मुली आहेत. मोठी मुलगी १६ वर्षांची आणि धाकटी १३ वर्षांची आहे. वडिलांचे निधन झाले आहे. गुरप्रीतने दहावीपर्यंत शिक्षण घेतले आहे. २० दिवसांपूर्वीच घरून कामावर परतले होते. कुटुंबाकडे २ एकरपेक्षा कमी जमीन आहे.

**ऑगस्टमध्ये सुनकिशाला येथे रिटेनिंग वॉल कोसळली होती**

याआधी ऑगस्ट २०२४ मध्ये तेलंगणातील नागार्जुनसागर धरणाजवळील सुनकिशाला येथे रिटेनिंग भिंत कोसळली होती. भारत राष्ट्र समितीने (बीआरएस) यासाठी काँग्रेस सरकारला जबाबदार धरत न्यायालयीन चौकशीची मागणी केली होती.

पान ४ वरून पुढे...

### संत गाडगेबाबा....

म्हणजे, व्यापाऱ्यांनी आनंदग्रामच्या युवा कार्यकर्त्यांचा उत्साह वाढवण्यासाठी त्यांना चहा, नाश्ता आणि फळांचा पाहुणचार दिला.

पर्यावरण संरक्षणाच्या दिशेने आणखी एक महत्त्वाचे पाऊल उचलत, कार्यकर्त्यांनी नागरिकांना आणि व्यापाऱ्यांना कापडी पिशव्यांचे वाटप केले. प्लास्टिकचा वापर टाळावा आणि कापडी पिशव्या स्वीकाराव्यात, असा संदेश त्यांनी दिला. या अभियानात व्यापारी महासंघ, बागवान संघटना, सामाजिक संस्था, महाविद्यालयीन विद्यार्थी आणि स्थानिक नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. पर्यावरण रक्षणासाठी संपूर्ण शहराने एकत्र येत दिलेला हा संदेश निश्चितच सकारात्मक बदल घडवेल. स्वच्छता हीच सेवा या गाडगेबाबांच्या तत्त्वाचा अवलंब करत, बीड शहराने प्लास्टिक मुक्ततेच्या दिशेने एक महत्वपूर्ण पाऊल उचलले आहे. हे अभियान पुढील काळातही सातत्याने राबवून बीड शहराला संपूर्णपणे प्लास्टिक मुक्त करण्याचा निर्धार आनंदग्रामच्या कार्यकर्त्यांनी व्यक्त केला आहे.

### कवडगाव येथे घरकुल...

प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले यावेळी गावचे सरपंच बशीर भाई शेख. ग्रामपंचायत सदस्य सतीष सोनवणे.ग्रा.पं. सदस्य दगडू कानाडे. ग्रा.पं.सदस्य नवनाथ करे. ग्रा.पं. सदस्य अनिल नांदुरकर. मा.जि. ग्रा. पं.सदस्य शिवलिंग उंडाळकर. जि.प. शाळेचे मुख्याध्यापक बडे सर शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष शेरू भाई पटेल. ग्रामपंचायत कर्मचारी महादू राशवे. नवनाथ पडगन. शेरू भाई. सह घरकुल लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पान ४ वरून पुढे...

### खेळ पैठणीचा कार्यक्रमास....

'खेळ पैठणीचा' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.या वेळी महिलांनी तळ्यात मळ्यात,उखाणे,फुगा फोडणे,फॅशन शो या सह अनेक गीतांवर ठेका धरत स्पर्धेत आपला सहभाग नोंदविला.अभूतपूर्व उत्साही वातावरणात हा कार्यक्रम पार पडला.हा कार्यक्रम आयोजित केल्याबद्दल हजारोच्या संख्येने आलेल्या महिलांनी श्याम धस यांचे विशेष आभार मानले.शिवाय आकर्षक बक्षिसांची लयलूट यावेळी पहायला मिळाली.ज्यामध्ये प्रथम पारितोषिक म्हणून घरगुती वापराचे फ्रीज द्वितीय पारितोषिक एल. इ. डी. टीव्ही,तृतीय पारितोषिक कुलर,चतुर्थ पारितोषिक वॉटर फिल्टर,पाचवे पारितोषिक मिक्सर होते.ज्यामध्ये अनुक्रमे प्रथम येण्याचा मान कडा येथील शुभांगी गणेश देवकर यांनी द्वितीय शितल सतीश भोसले तृतीय काजल भाऊसाहेब भोजने चतुर्थ रोहिणी दिलीप जगताप तर पाचवे पारितोषिक जया परमेश्वर वारंगुळे यांनी पटकावले. शिवाय यामध्ये सहभागी झालेल्या तीनशे महिलांना आकर्षक स्वरूपात भेटवस्तू देण्यात आल्या.

### अखेर 2 वर्षांपासून घराची...

प्रश्न सुटणार असल्याने चेह-यावर समाधान दिसून आले. घरकुल लाभार्थ्यांकडुन एकही रुपया न घेता कागदपत्रे सुद्धा सरपंचांनी स्वखर्चाने बनवली हे कौतुकास्पद : डॉ.गणेश ढवळे घरकुल मंजुरी बाबतीत लाभार्थ्यांकडुन अवाजवी पैसे घेतल्याची ओरड एकीकडे होत असताना लिंबागणेशचे सरपंच बालासाहेब जाधव, दादासाहेब गायकवाड व बाळकृष्ण थोरात यांनी लाभार्थ्यांकडुन एकही रुपया न घेता शासन दरबारी फायली फिरवत स्वखर्चाने कागदपत्रे सुद्धा बनवली.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# ऐतिहासिक महादुर्ग किल्ल्याची भिंत ढासळून अनेक महिने उलटले प्रशासनाचे मात्र दुर्लक्ष

## खासदार आमदार ऐतिहासिक महादुर्ग किल्ल्याच्या कामासाठी पाठपुरावा करणार का? ; पुरातत्त्व विभागाने प्रशासकीय मान्यतेला पाठवलाय प्रस्ताव

**विश्वास शिनगारे**

धारूर येथील महादुर्ग किल्ल्याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष असल्याने ऐतिहासिक वास्तूचे जतन होत नसल्याचे दिसून येत आहे परिणामी ऐतिहासिक महादुर्ग किल्ल्यामध्ये पहाण्यासाठी येणाऱ्या पर्यटकातून नाराजीच सूर उमटत आहे. किल्ल्यातील भिंत कोसळून अनेक महिने झाले तरी याकडे दुर्लक्ष झाल्याने इतिहास प्रेमीतून नाराजी होत आहे तरी तात्काळ किल्ल्याची भिंत नव्याने उभा करून ऐतिहासिक वास्तूचे जतन करावे अशी मागणी नागरिकातून होत आहे.

शहरातील ऐतिहासिक महादुर्ग किल्ल्याकडे सांस्कृतिक विभागाचे दुर्लक्ष होत आहे. २४ ऑगस्ट २०२४ रोजी मागील काही वर्षाखाली बांधण्यात आलेली भिंत कोसळली होती याकडे कसलेच लक्ष न दिल्याने ऐतिहासिक वास्तूचे जतन होणार का नाही असा प्रश्न समोर येत आहे. किल्ला पाहण्यासाठी येणाऱ्या पर्यटकांमधून नाराजीचा सूर येत आहे. किल्ल्यामध्ये प्रवेश करताना पडलेल्या भिंतीमुळे पर्यटकांना याचा त्रास सहन करावा लागत आहे. भिंत कोसळून ६ महिन्याचा कालावधी उलटून ही याकडे दुर्लक्ष होत आहे. छत्रपती संभाजी नगर येथील



पुरातत्व विभागाकडून पडलेल्या भिंतीची पाहणी करून नव्याने बांधण्यासाठी त्याचे मोजमाप करत दोन कोटी एकोणीस लाखाचे काम मंजुरीसाठी सांस्कृतिक विभाग मुंबई कार्यालयामध्ये पाठवण्यात आले आहे. पण सांस्कृतिक विभागाने या मंजुरी कडे दुर्लक्ष केल्याने ऐतिहासिक वास्तूचे काम रखडले आहे यामुळे किल्ला पाहण्यासाठी येणाऱ्या पर्यटकाला नाहक त्रास सहन करावा लागत आहे. तरी सांस्कृतिक विभागाकडे लोकप्रतिनिधी खासदार बजरंग सोनवणें तसेच माजलगाव मतदारसंघाचे आमदार प्रकाश सोळंके यांनी पाठपुरावा करून प्रशासकीय मान्यत घेऊन निधी उपलब्ध करून ऐतिहासिक महादुर्ग किल्ल्यातील भिंत कोसळलेले काम तात्काळ मंजूर करून कामाला गती द्यावी अशी मागणी किल्ला प्रेमीतून होत आहे.

**ऐतिहासिक महादुर्ग किल्ल्यातील भिंत कोसळून अनेक महिने झाले पण याची कसलीच दखल प्रशासनाने घेतली नाही धारूर शहराला ऐतिहासिक किल्ल्यामुळेच वैभव आहे. अशा वैभव असलेल्या ऐतिहासिक महादुर्ग किल्ल्याकडे दुर्लक्ष होणे ही मोठी बाब आहे. याकडे लोकप्रतिनिधी ने लक्ष देऊन संबंधित सांस्कृतिक विभाग मुंबई येथे पाठपुरावा करून कोसळलेली भिंत चांगल्या दर्जाची तसेच पर्यटकांसाठी भौतिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी पाठपुरावा करावा. – विजय शिनगारे, किल्ला प्रेमी , धारूर.**

**धारूर येथील ऐतिहासिक महादुर्ग किल्ल्याला भिंत पडल्यानंतर भेट देऊन पडलेल्या भिंतीची पाहणी करून नव्याने बांधण्यासाठी लागणारा खर्च दोन कोटी एकोणीस लाख रुपयाचे इस्टिमेट मंजुरीसाठी सांस्कृतिक विभाग मुंबई याकडे २० सप्टेंबर २०२४ पाठवण्यात आले आहे. मंजुरी आल्यानंतर तात्काळ काम चांगल्या दर्जेचे करून घेतले जाईल. – पुरातत्त्व विभाग, सहाय्यक संचालक**

# युरोपमध्ये होणाऱ्या कुडो वर्ल्ड कप स्पर्धे करिता सुर्डीच्या सौरभ जाधवची निवड

## आ. विजयसिंह पंडित यांनी सत्कार करुन दिल्या शुभेच्छा

**गेवराई । प्रतिनिधी**

युरोपमध्ये होणाऱ्या कुडो वर्ल्डकप स्पर्धेसाठी गेवराई विधानसभा मतदारसंघातील सुर्डीच्या सौरभ जाधव यांची निवड झाली असून आ. विजयसिंह पंडित यांनी सौरभचा जाहीर सत्कार करून स्पर्धेसाठी जाणाऱ्या सौरभ जाधवचा गेवराई विधानसभा मतदार संघाला अभिमान आहे अशी प्रतिक्रिया विजयसिंह पंडित यांनी यावेळी दिली.



युरोपमध्ये होणाऱ्या कुडो वर्ल्ड कप स्पर्धेसाठी शनिवार दि. ७ फेब्रुवारी रोजी थलेटीका फिटनेस, सूरत येथे वर्ल्ड कप निवड चाचणीचे आयोजन करण्यात आले होते, त्यात भारतातील एकूण २६ राज्यातील कुडो राष्ट्रीय विजेत्या स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. त्यात बीड जिल्ह्यामधून महाराष्ट्र राज्यामार्फत गेवराई विधानसभा मतदारसंघातील मोजै सुर्डी येथील सौरभ जाधवची निवड करण्यात आली. युरोप येथे जून २०२५ मधे होणाऱ्या कुडो वर्ल्ड कप स्पर्धेसाठी सौरभची निवड झाली असून राष्ट्रीय कोच हांशी मेहुल वोरा यांच्या मार्गदर्शनाखा भारत देशाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी युरोप येथे टीम इंडिया जाणार आहे. सोरभला प्रशिक्षक अरविंद मोरे, ज्ञानेश्वर गायकवाड यांचे मार्गदर्शन लाभले.

# धम्मभूमी मौजे शिवणी येथे माता रमाई जयंती संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

प्रियदर्शी धम्मसंस्कार शिक्षण संस्था बीडच्या वतीने धम्मभूमी मौजे शिवणी येथे त्यागमूर्ती माता रमाई यांची जयंती उत्साहात संपन्न करण्यात आली.

याप्रसंगी पूज्य भिक्ख महाविरो थेरो काळेगाव अहमदपूर यांच्या हस्ते तथागताच्या प्रतिमेस तर प्रमुख अतिथी प्रा.डॉ. भारती फुलेकर यांच्या हस्ते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व त्यागमूर्ती माता रमाई यांच्या यांच्या प्रतिमेस पुष्प व पुष्पमाला अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. सामुदायिक त्रिशरण पंचशील ग्रहण केल्यानंतर पूज्य भिक्खु महाविरो थेरो यांनी आपल्या धम्मदेशेत माघ पौर्णिमेच्या दिवशी तथागताच्या जीवनात



घडलेल्या घटनेबद्दल सविस्तर माहिती दिली. सध्याच्या इंटरनेट, मोबाईलच्या जमान्यात माणूस माणसापासून दूर जात आहे. परंतु माणसाने माणसाशी कसे वागावे हे तथागताने विपश्यनेच्या मार्गातून माणूस त्रिशरण, पंचशील, व दहा पारमितेच्या पालनास तयार होतो. मैत्री, प्रेम, करुणा, यासारख्या दहा पारमिता पाळून कुशल कर्म करण्यास तत्पर होतो हे अनेक उदाहरणाद्वारे सांगितले. प्रमुख अतिथी प्रा.डॉ.भारती फुलेकर यांनी त्यागमूर्ती माता रमाईच्या जीवनातील डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या शिक्षणाकरिता केलेला त्याग व समाज हितासाठी, देशासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर करीत असलेल्या प्रयत्नांना सावलीसारखी सोबत दिली. अशा प्रकारच्या माता रमाईच्या जीवनातील अनेक दुःखद प्रसंग सांगून सर्वांच्या डोळ्यासमोर त्यांचा जीवनपट उभा केला. तेव्हा सर्व उपस्थित गहिवरून गेले. याप्रसंगी लहान, बालक, बालिकांनी माता रमाईच्या जीवनावर गीत व नाट्यप्रसंग करून दाखवले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक अलकाताई डोंगरे यांनी केले तर सूत्रसंचालन वंदनाताई वाघमारे यांनी केले. सर्वांचे आभार ज्योतीताई सरवदे यांनी व्यक्त केले. कार्यक्रमास परिसरातील महिला पुरुष व बालकांची व संस्थेच्या बहुतांश सदस्यांची उपस्थिती होती. सरणातय व भोजनदान खीर दानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# विशाखा भिल्लारे- वरपे उत्कृष्ट शोधनिबंध पुरस्काराने सन्मानित

**बीड । प्रतिनिधी**

मराठी समाजशास्त्र परिषद आणि श्रीमती मीनलबेन मेहता कॉलेज, पाचगणी, तालुका महाबळेश्वर जिल्हा सातारा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मराठी समाजशास्त्र परिषदेचे ३४ व्या राष्ट्रीय अधिवेशन दिनांक १७ व १८ फेब्रुवारी २०२५ रोजी 'लिंगभाव,शिक्षक आणि विकास' या मुख्य विषया अंतर्गत आयोजित करण्यात आले होते.या राज्यस्तरीय अधिवेशनाच्या अनुषंगाने महाराष्ट्र आणि महाराष्ट्राबाहेरील १९३ शोध निबंध सादर व प्रकाशित झाले. या शोधनिबंधातून संशोधकांसाठी भारतीय समाजशास्त्राचे जनक डॉ. जी. एस.घुर्ये यांच्या नावाने दिला जाणारा उत्कृष्ट शोधनिबंध पुरस्कार बलभीम महाविद्यालयातील



संशोधक व सहाय्यक प्राध्यापक विशाखा विलास भिलारे(वरपे) यांनी महिला प्रश्नावर व महिला सरपंचांच्या विषयावर संशोधन करून 'महिला सरपंच म्हणून अधिकार वापरताना येणाऱ्या अडचणींचा अभ्यास :बीड तालुक्याच्या महिला सरपंचाच्या संदर्भात समाजशास्त्रीय अभ्यास, या शोधनिबंधनाला मिळाला. हा पुरस्कार देताना शोधनिबंध लेखन आणि सादरीकरण या बाबी लक्षात घेऊन संशोधन निवड समितीने मराठी समाजशास्त्र परिषदेला या निबंधाची शिफारस केली होती.

मराठी समाजशास्त्र परिषदेचे अध्यक्ष प्रो. लक्ष्मणसिंग साळोक ,सचिव प्रो. कालिदास भांगे, कोषाध्यक्ष प्रो. प्रियदर्शन भवरे, श्रीमती मीनलबेन मेहता महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफेसर सतीश देसाई, डॉ. पद्माकर सहारे

तसेच मराठी समाजशास्त्र परिषदेची कार्यकारणी सदस्य डॉ. दिगंबर तंगलवाड, महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय विद्यापीठ प्रयागराज, आदी मान्यवरांच्या उपस्थितीत हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

# बीड जिल्हा वकील संघाचे स्नेहसंमेलन

## मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे : ॲड.येवले

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्हा वकील संघाच्या वतीने वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. मंगळवार दि.२५ ते २७ फे ब्रुवारीपर्यंत विविध कार्यक्रम होणार आहेत. यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात होणार्या या कार्यक्रमासाठी उपस्थित राहण्याचे आवाहन वकील संघाचे अध्यक्ष ॲड.आर. डी. येवले यांनी केले आहे. बीड जिल्हा वकील संघाच्या वार्षिक स्नेहसंमेलनाचे उद्घाटन मंगळवार दि.२५ रोजी उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपिठाचे न्यायमुर्ती संतोष चपळगावकर व प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश आनंद यावलकर यांच्या हस्ते सायंकाळी ६.३० वाजता होणार आहे. यानंतर



मान्यवरांच्या हस्ते क्रिडा स्पर्धेतील विजेत्यांना बक्षीस वितरण होणार असून रात्री ८ वाजता जिल्हा वकील संघाच्या गायक कलाकारांनी सादर केलेल्या गीतांचा कार्यक्रम होणार आहे. दि.२६ रोजी सायंकाळी ६.३० वाजता दुसर्या दिवशीच्या कार्यक्रमांचा उद्घाटन सोहळा होणार असून ७ वाजता शेला पागोटे कार्यक्रम होणार आहे.

# नागसेन बुद्ध विहार येथे संतश्रेष्ठ गाडगेबाबा यांची जयंती उत्साहात संपन्न

## वाचाल तर वाचाल तर्फे ५० पुस्तके वितरित करून विनम्र अभिवादन

**बीड । प्रतिनिधी**

शिक्षणापासून वंचित असलेल्या बहुजनांनी शिक्षणाकरिता भांडीकुंडी विका उपाशी पोटी राहा पण आपल्या पाल्यास शिक्षण द्या व अंधश्रद्धा, आळस,नशा पाणी मादक पदार्थ व कर्जबाजारीपणा पासून देवाचे नवस फेडणे, यापासून दूर राहण्याचा व माणसाची सेवा हीच ईश्वराची सेवा आहे. स्वतः ग्रामस्वच्छता करून परिसर स्वच्छतेचे महत्व सागनारे माणसातच देव आहे हे आपल्या अनमोल कीर्तनातून बोली भाषेत बहुजन समाजाला समजावून सांगणारे संतश्रेष्ठ संत गाडगेबाबा यांना नागसेन बुद्ध विहार धानोरा रोड बीड येथे वाचाल तर वाचाल या फिरते मोफत वाचनल्यातर्फे विहार



परिसरातील विद्यार्थ्यांकरिता ५० पुस्तकांचा संच वाचनालयाचे डी. जि वानखेडे यांनी प्रमुख उपस्थित असलेले सरस्वती विद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष मा.उत्तमराव पवार व सेवानिवृत्त जिल्हा प्रबंधक एलआयसी यु.एस. वाघमारे यांच्या हस्ते वितरित करण्यासाठी श्रबौद्धाचार्य डी. एन. पोटभरे यांना सुपूर्त केला व संत गाडगेबाबा यांना विनम्र अभिवादन करण्यात आले. या संचामध्ये छत्रपती शिवाजी महाराज, राष्ट्रमाता जिजाऊ, अहिल्यादेवी होळकर, संत गाडगेबाबा, डॉ एपीजे अब्दुल कलाम, स्वामी विवेकानंद , व डॉ. बाबासाहेब आंबेडकर, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, महात्मा ज्योतिबा फुले तसेच वैज्ञानिक दृष्टिकोन म्हणजे काय अशा विविध विषयावरील पुस्तकांचा समावेश आहे.

# राष्ट्रसंत गाडगे महाराज यांना जयंती निमित्त डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर विद्यालयांमध्ये विनम्र अभिवादन

**बीड । प्रतिनिधी**

बीड येथील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर विद्यालयांमध्ये अंधश्रद्धा निर्मूलनाचे जनक महान राष्ट्रसंत गाडगे महाराज यांना जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम या विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक व्ही.जी. आव्हाड आणि मुख्याध्यापक बी.ए. हावळे यांच्या मुख्य उपस्थितीमध्ये उत्साहात संपन्न झाला.

याप्रसंगी राष्ट्रसंत गाडगे महाराज स्वच्छता अभियानांतर्गत विद्यार्थ्यांनी शालेय परिसर स्वच्छ केला. या कार्यक्रमाच्या प्रारंभी राष्ट्रसंत गाडगे महाराज आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी व्हीजी आव्हाड आणि बीए हावळे यांनी व्यासंगी आणि अभ्यासू विचार प्रतिपादन करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाचे संचलन सांस्कृतिक विभाग प्रमुख विजय देशमुख, प्रास्ताविक संतोष मेश्राम आणि आभार प्रदर्शन डब्ल्यू. एस. वाघमारे यांनी केले. यावेळी



आर.बी. घुले, यु.बी.पवळ, डी.जी. हजारे, एल.बी. हजारे, शिक्षकेतर कर्मचारी बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

# राजर्षी शाहू कन्या विद्यालयात राष्ट्रसंत गाडगेबाबा यांची जयंती साजरी

**बीड । प्रतिनिधी**

श्री छत्रपती राजर्षी शाहू समाज प्रबोधन मंडळ संचलित, राजर्षी शाहू कन्या प्राथमिक व माध्यमिक विद्यालय, राजमाता इंग्लिश स्कूल तेलगाव रोड, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने थोर समाजसेवक, अज्ञान, अंधश्रध्दा, धर्मभोळेपणा, कर्मकांड, पशुहत्या यावर कीर्तनाच्या माध्यमातून प्रहार करत समाजामध्ये शिक्षणाचा प्रसार करून वैज्ञानिक दृष्टी निर्माण करणारे, ग्राम स्वच्छतेचे प्रणेते, मानवतेचे पुजारी महान कर्मयोगी संत गाडगे बाबा यांची जयंती साजरी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.




यावेळी श्री छत्रपती राजर्षी शाहू समाज प्रबोधन मंडळाचे सचिव प्रा.जे.पी. शेळके, विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीम.कदम एस.डी., प्राथमिकचे मुख्याध्यापक राऊत आर.टी, राजमाता इंग्लिश स्कूलच्या प्राचार्या श्रीम. लोखंडे आर.डी. यांच्या हस्ते राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# शिवशाही महानाट्यात सिने अभिनेत्री अलका कुबल जिजाऊ माँ साहेब व अभिनेत्री अमृता पवार महाडिक यांची सोयराबाईची भूमिकेत

**शिरूर कासार । प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवन कार्यावर आधारित शिवशाही या ऐतिहासिक महानाट्याचे तीन प्रयोग शिवजन्मोत्सवानिमित्त गेवराई येथे आयोजित केले होते.

सर्व शिवप्रेमी नागरीकांनी त्याचा लाभ घ्यावा असे आवाहन आ. विजयसिंह पंडित यांनी केले होते. शिवजन्मोत्सवानिमित्त आयोजित करण्यात आलेले महानाट्य मध्ये यावेळी सुप्रसिद्ध सिने अभिनेत्री अलका कुबल, या जिजामाता आऊसाहेबांच्या भूमिकेत होत्या तर छत्रपति शिवाजी महाराजांची भूमिका हे शंतनु मोघे साकारत होते, या महानाट्याचे दिगदर्शक महेंद्र महाडिक हे असून यांच्यासह सिने अभिनेते महेश कोकाटे, प्रकाश धोत्रे,रमेश रोकडे, डॉ. राजेश आहेर अभिनेत्री अमृता पवार महाडिक, तृप्ती भोसले, शिवानी जगदाळे सह इतर अनेक कलाकार मोठ्या उत्साहात विविध प्रकारच्या भूमिका सकरत आहेत.



### •पाच मजली किल्ल्याची हुबेहुब प्रतिकृती..!•

या महानाट्यसाठी पाच मजली किल्ल्याची हुबेहुब प्रतिकृती, शोभीवंत सिंहासन मेघडंबरी, जहाजाचा वापर करुन महाराजांच्या कोकण मोहिमेचा जिवंत देखावा, भव्य राज्याभिषेक सोहळा, शिवकालीन शस्त्रास्त्रे व युद्ध साहित्य यासह अधुनिक ध्वनी व प्रकाश योजना, घोडे, बैलगाडी, पालखी, नेत्रदिपक अतिषबाजी यांचा वापर करुन मराठा व पातशाही यांच्या तलवारींचा खणखणाट, तोफांचा गडगडाट, अग्नीबाणांचा वर्षाव असा घनघोर रणसंग्राम याच देही पाहण्याचे सौभाग्य शिवप्रेमींना लाभले.

### •झी मराठी..स्टार प्रवाह.. वरील मालिकेसह महानाट्य मध्ये विषेश भूमिका..!•

मी १५ वर्षांन पासून मराठी चित्रपट सृष्टी मध्ये काम करत आहे. त्या माध्यमातून अनेक प्रायोगिक व व्यावसायिक नाट्य क्षेत्रात ही काम केले आहे. त्याच प्रमाणे मराठी चित्रपट सृष्टी मध्ये नावाजलेले अभिनेते,दिग्दर्शक आणि निर्माते महेश कोठारे यांची जय मल्हार ही मालिका झी मराठी वर सुरु असताना त्या मध्ये बानू बाई ह्या व्यक्ती रेखेच्या बहिणीची भूमिका साकरण्यास मिळाली, त्याच प्रमाणे स्टार प्रवाह वरील लक्ष या मालिके मध्ये मध्ये देखिल अनेक प्रकारची भूमिका साकारल्या आहेत. सध्या मी महेंद्र वसंतराव महाडीक लिखित दिग्दर्शीत शिवपुत्र संभाजी या महानाट्या मध्ये पुतळा बाई साहेब ह्यांची भूमिका साकाराते आहे.तर शिवशाही या महानाट्या मध्ये सोयराबाई साहेब ही भूमिका साकारत आहे.तसेच महाराज शंभू छत्रपती प्रोडक्शन ची निर्माती म्हणून धुरा सांभाळते आहे. – सौ,अमृता महेंद्र महाडिक, सिने अभिनेत्री तथा महाराज शंभू छत्रपती प्रोडक्शन निर्माती.

# संत गाडगेबाबा जयंतीनिमित्त बीडमध्ये 'प्लास्टिक मुक्त बीड' अभियान उत्साहात संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

संत गाडगेबाबा जयंतीनिमित्त आज बीड शहरात प्लास्टिक मुक्त बीड अभियान मोठ्या उत्साहात पार पडले. या उपक्रमाअंतर्गत भाजी मंडई व जुना मोंढा येथे प्लास्टिक कचरा संकलन व स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. सकाळी ८ वाजता काकू नाना मंडई येथे प्रारंभ झालेल्या या अभियानात स्वच्छता संदेश देणाऱ्या घोषणांनी वातावरण भारून गेले. आनंदग्रामच्या युवा कार्यकर्त्यांनी प्लास्टिक कचरा गोळा करत, नागरिकांना प्लास्टिक मुक्त जीवनशैलीचे महत्त्व



पटवून दिले. या वेळी उपस्थित नागरिक आणि व्यावसायिकांनी प्लास्टिक मुक्तीची सामूहिक शपथ घेतली. या अभियानाचे आयोजन इन्फंट इंडिया – आनंदग्रामतर्फे दत्ता बारगजे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. गेल्या अनेक वर्षांपासून विविध सामाजिक उपक्रम हाती घेणाऱ्या आनंदग्रामने प्लास्टिक मुक्तीच्या माध्यम ातून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. या मोहिमेत व्यापारी महासंघ (कॅट) आणि बागवान संघटनेच्या सदस्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. विशेष

▶▶ उर्वरित पान २ वर



*गेवराई तालयुकयातील कै.बाबासाहेब वराट सार्वजनिक वाचनालय बराहाणपुर ता. गेवराई जि. बीड येथे सत गाडगेबाबा यांची जयंती साजरी करण्यात आली या कार्य करमास सतयभामाबाई वराट संगीता पवार उमाताई यादव मोनिका पवार आसराबाई शेडगे सुवरणा पवार गयाबाई यादव याच्या सह अनेक महिला उपस्थित होतया आभार प्रदर्शन भागवत वराट यांनी केले.*

# छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त रौद्रशंभू युवा प्रतिष्ठानच्या वतीने भव्य रक्तदान 78 रक्तदात्यांनी केलं रक्त दान



**बीड । प्रतिनिधी**

नवनाथ अण्णा शिराळे यांच्या उपस्थितीत तसेच अक्षय भैय्या शिराळे यांच्या मार्गदर्शनाखाली रौद्रशंभू युवा प्रतिष्ठान चे अध्यक्ष गणेश भैय्या शिराळे यांनी भव्य रक्तदान शिबिर आयोजित केले होते

शिबिराचे आयोजन: संस्थापक गणेश शिराळे, रक्तदान शिबिरामध्ये युवकांचा मोठ्या प्रमाणात उत्सपूर्त प्रतिसाद, ७८ योद्ध्याने केले रक्तदान.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती देशभरात मोठ्या उस्तहात साजरी होते. त्या अनुषंगाने छत्रपती शिवाजी महाराज यांचा जयंती निम्मित बीड शहरात भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन रौद्रशंभू युवा प्रतिष्ठानच्या वतीने केले होते. रक्तदान हे जात पात पाहुण केले जात नाही रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे. १९ फेब्रुवारी रोजी स.१० ते ४ वाजे पर्यंत मुत्काई लॉन्सच्या पाठीमागे रक्तदान शिबिर आयोजित केले होते. रक्तदान म्हणजे जीवनरक्षक ते आपण व्हा, असे आवाहन रौद्रशंभु युवा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष तथा युवा नेते गणेश भैय्या शिराळे पाटील यांनी केले होते.

# कवडगाव येथे घरकुल लाभार्थ्यास प्रमाणपत्राचे वाटप

**वडवणी । प्रतिनिधी**

वडवणी तालुक्यातील कवडगाव येथील ग्रामपंचायत कार्यालय येथे प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा –२ सन २०२४–२५ वर्षातील मंजूर लाभार्थ्यांना प्रमाणपत्र वाटप करण्यात आले सध्या पूर्ण महाराष्ट्रामध्ये प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत गोरगरीब नागरिकास त्याच्या हक्काचे



घर मिळावे यासाठी प्रधान मंत्री आवास योजने अंतर्गत घरकुलाचे वाटप करण्यात येत आहे. त्याच अनुषंगाने कवडगाव येथील प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत मंजूर लाभार्थ्यास प्रमाणपत्राचे वाटप करत सर्व लाभार्थ्यांनी आपले हक्काचे घर बांधून घ्यावे अशा सूचना करत लाभार्थ्यास

▶▶ उर्वरित पान २ वर

## जयभिम महोत्सवाच्या तयारीला सुरुवात

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहराच्या सार्वजनिक जयभिम महोत्सवाने अवघ्या राज्याला आदर्श निर्माण करुन दिला आहे.त्या अनुषंगाने यंदाचा जयभिम महोत्सव साजरा करण्यासाठी शनिवार (दि.२२) फेब्रुवारी रोजी नियोजन बैठक आयोजित करण्यात आली होती. सदरील बैठक बीड शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे युवा रिपाइंचे प्रदेशाध्यक्ष पप्पु कागदे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

## खेळ पैठणीचा कार्यक्रमास महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद; कड्याच्या शुभांगी देवकरने पटकावला प्रथम क्रमांक



**आष्टी । प्रतिनिधी**

जामगावचे सरपंच राधेश्याम धस यांच्या वाढदिवसानिमित्त आष्टी येथे शुक्रवारी पंचायत समितीच्या प्रांगणात महिलांसाठी सीने अभिनेते क्रांतीनाना मळेगावकर यांचा खेळ पैठणीचा या होम मिनिस्टर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी झालेल्या विविध खेळांच्या स्पर्धेत प्रथम क्रमांक कडा येथील शुभांगी देवकरने पटकावला मानाची पैठणी,फ्रीज,सन्मानचिन्ह असे बक्षिसांचे स्वरूप होते.प्रामुख्याने मनोरंजन व प्रश्नमंजुषा व विविध

**श्याम धस यांच्या वाढदिवसानिमित्त शुक्रवारी सकाळी नऊ ते पाच या वेळेत पंचायत समिती कार्यालयाच्या प्रांगणात आयोजित रक्तदान शिबिरामध्ये १३० रक्तदात्यांनी रक्तदान केले.**

उपक्रमास महिला वर्गांची अलोट गर्दी कार्यक्रमाचा केंद्रबिंदू ठरला. श्याम धस यांच्या वाढदिवसाच्या अनुषंगाने महिला भगिनींसाठी खास सिने अभिनेते क्रांतीनाना मळेगावकर यांच्या राज्यभर गाजत असलेल्या होम मिनिस्टर

▶▶ उर्वरित पान २ वर

# बंडू खांडेकर हे अजातशत्रू व्यक्तिमत्त्व : गणेश गटकळ

**दिंद्रुड । प्रतिनिधी**

समाजसेवक, राजकारणी व पत्रकार या तीन वेगवेगळ्या व्यक्तिमत्त्वांचा बंडूजी खांडेकर हे अभिनव मिलाफ आहेत. सकारात्मक पत्रकरिता करतांना देवदूत डॉ.ओमप्रकाश शेटे यांच्या माध्यमातून हजारो रुग्णांना मदतीचा हात देऊन त्यांच्या जीवनामध्ये नवचैतन्य निर्माण करणारे बंडु खांडेकर हे अजातशत्रू व्यक्तिमत्त्व असल्याचे प्रतिपादन अभिनव पब्लिक स्कूलचे संस्थापक गणेश गटकळ यांनी केले. शिक्षक, पत्रकार व दीप मॅन्युफॅक्चरिंग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सत्कार कार्यक्रमात ते बोलत होते. माजलगाव पत्रकार संघाच्या वतीने दिला जाणारा यावर्षीचा मूकनायक पुरस्कार दिंद्रुड येथील



पत्रकार बंडू खांडेकर यांना नुकताच प्रदान करण्यात आला. या पार्श्वभूमीवर दीप मॅन्युफॅक्चरिंग, शिक्षक बांधव व पत्रकार संघाचे वतीने खांडेकर यांच्या सत्काराचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक शरद कुलकर्णी होते. तर व्यासपीठावर मुख्याध्यापक आदिनाथ चांदबोधले, पांडुरंग कटारे, गणेश गटकळ, पत्रकार संघाचे मार्गदर्शक प्रकाश काशीद, अध्यक्ष अमोल ठोंबरे यांची प्रमुख उपस्थिती होती. संयोजकाच्या वतीने खांडेकर त्यांचा शाल, श्रीफळ व गौरवपत्र देऊन सपत्नीक सत्कार करण्यात आला. मनोहर कटारे, संजीवनी राऊत व अमोल ठोंबरे यांच्या पुढाकाराने या सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. सत्कारास उत्तर देताना बंडू खांडेकर म्हणाले की, विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी उपेक्षित व वंचित घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी 'मूकनायक' हे पाक्षिक सुरू केले. शोषित व दबलेल्या समाजाचा बुलंद आवाज बनवलेल्या मूकनायक नावाने मला पुरस्कार मिळाला आहे, हे मी माझे भाग्य समजतो. सत्कार व पुरस्काराने माझी जबाबदारी आणखी वाढली आहे. पत्रकारितेच्या माध्यमातून समाजातील गरजवंताला न्याय मिळवून देण्यासाठी यापुढेही प्रामाणिकपणे काम करु असा विश्वासही खांडेकर यांनी व्यक्त केला. यावेळी दिंद्रुड पंचक्रोशीतील सामाजिक कार्यकर्ते, मुख्याध्यापक, शिक्षक, पत्रकार यांची विशेष उपस्थिती होती.



*बीड : सोमेश्वर मंदिर येथे अखंड हरिनाम सप्ताह निमित्त ह भ प विक्रम महाराज काळे यांचा सत्कार करताना सोमेश्वर महादेव हनुमान मंदिर संस्थांचे अध्यक्ष नवनाथ शिराळे पाटील पांडुरंग जांनवळे भक्तगण .*

# अखेर 2 वर्षांपासून घराची पडझड झाल्याने महिला बचतगट भवनामध्ये राहणा-या निराधार सरस्वती शिंदेना घरकुल मिळाले

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील लिंबागणेश ग्रामपंचायत कार्यालयात काल दि.२२ शनिवार रोजी सरपंच बालासाहेब जाधव, ग्रामविकास अधिकारी वीर,सेवा सोसायटी चेअरमन रविंद्र निर्मळ, बाळकृष्ण थोरात, दादा गायकवाड, श्रीहरी



निर्मळ यांच्या उपस्थितीत गावातील एकुण १५७ लाभार्थ्यांना प्रधानमंत्री आवास योजनेचे मंजुरी पत्र वाटप करण्यात आले.आपल्या हक्काचे घर असावे,हक्काचा निवारा, घरकुल मिळवून देण्याचे काम प्रधानमंत्री आवास योजनेमुळे लाभार्थीचे घराचे स्वप्न साकार होणार असल्याने लाभार्थ्यांनी आनंद व्यक्त केला.

लिंबागणेश येथील सरस्वती माणिक शिंदे वय ६० वर्षे यांच्या पतीचे निधन ३० वर्षांपूर्वी झाले. मोलमजुरी करून मुलीचे पालनपोषण करून लग्न लावून दिले. २ वर्षांपूर्वी राहते मातीचे घर जमिनदोस्त झाले. त्यानंतर महिला बचतगट भवनात संसार थाटला.२ वर्षांपासून भवनात राहतात. रात्री लाईट नसल्याने १५ दिवसांपूर्वी घुशीने गालाचा चावा घेतला. अखेर काल ग्रामपंचायत कार्यालयात त्यांना प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत घरकुल मंजुरीचे प्रमाणपत्र मिळाले आणि अखेर त्यांच्या निवा–याचा

▶▶ उर्वरित पान २ वर

